


दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : ३६२ वा | सोमवार दि ११ मे २०२६ | पृष्ठ ८ | किमंत ३ रुपये

# समोर आलेलं प्रकरण १ टक्के सुद्धा नाही, बडे लोक अडकले, पैशांचं रॅकेट, रोहित पवाराचा आरोपांचा बॉम्ब...

**वृत्तसंस्था/ नाशिक**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात खळबळजनक दावा केला आहे. अशोक खरात प्रकरणात अनेक मोठे नेते, अधिकारी आणि व्यवसायिक असल्याचा दावा रोहित पवार यांनी केला आहे. तसेच या प्रकरणातून आपले नाव वगळले जावे यासाठी पैशांचं खूप मोठं रॅकेट काम करत असल्याचा आरोप रोहित पवार यांनी केला आहे. या रॅकेटमधून आपलं नाव निघावं यासाठी एक ट्रिक वापरली जात असल्याचं रोहित पवार यांनी म्हटलं आहे. रोहित पवार यांच्या या आरोपांमुळे प्रकरणाची व्याप्ती आणखी कितीतरी पटीने मोठी असेल का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. कारण आतापर्यंत जे समोर आलं आहे ते १ टक्के सुद्धा नाही. त्यापेक्षाही भीषण हे प्रकरण असल्याचा दावा रोहित पवार यांचा आहे. यामुळे या प्रकरणाबाबतचा सस्पेन्स आणखी वाढला आहे.रोहित पवार नेमकं काय म्हणाले? भोंदू खरात प्रकरणात अनेक मोठे नेते, अधिकारी, व्यावसायिक अडकले आहेत. त्या प्रकरणातील १ टक्के सत्य देखील समोर आलेले नाही. समोर जे काही आले आहे ते केवळ छोटे मासे आहेत. यामध्ये अनेक मोठे मासे देखील आहेत. महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्वात काळा अध्याय म्हणून हे प्रकरण नोंद होणार आहे. या प्रकरणाच्या तपासातून सुटका करून घेण्यासाठी किंवा नाव बाजूला काढण्यासाठी एक मोठे आर्थिक रॅकेट काम करत असल्याची माहिती समजत आहे. मोठमोठ्या रकमा घेऊन अनेकांना यातून अलगद बाहेर काढले जात आहे, असा दावा रोहित पवार यांनी केला आहे. ज्यांना या प्रकरणातून बाहेर काढायचे आहे त्यांना भोंदू विरोधात फसवणूक केल्याची तक्रार करायला सांगितले जाते आणि या प्रकरणातून बाहेर काढले जाते, अशी ही पद्धती असल्याची माहिती आहे. या माहितीची शहानिशा करून गृहमंत्री महोदयांनी योग्य ती कारवाई करावी, ही विनंती, असं रोहित पवार यांनीम्हटलं आहेत. राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांची आज या प्रकरणी सखोल चौकशी झाली. अशोक खरात याचे प्रकरण समोर आल्यानंतर त्याचे रुपाली चाकणकर यांच्यासोबतचे विविध कार्यक्रमांमधील फोटो समोर आले होते. यामुळे रुपाली चाकणकर यांचीदेखील चौकशी व्हावी, अशी मागणी केली जात होती. याबाबतच्या सर्व आरोपांच्या पार्श्वभूमीवर रुपाली चाकणकर यांची सविस्तर चौकशी पार पडली. या प्रकरणाचा सखोल तपास करणाऱ्या एसआयटीच्या प्रमुख तेजस्वी सातपुते यांनी रुपाली चाकणकर यांची चौकशी केली. तब्बल सहा तास ही चौकशी चालली. रुपाली चाकणकर चौकशीसाठी नाशिकमध्ये दाखल झाल्या




तेव्हा त्यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली होती. आपण एसआयटीच्या सर्व प्रश्नांना उत्तर देऊ. तपास अधिकाऱ्यांना सहकार्य करु, असं रुपाली चाकणकर म्हणाल्या होत्या. पण सहा तासांच्या प्रदीर्घ चौकशीनंतर रुपाली चाकणकर बाहेर पडल्या तेव्हा त्यांनी माध्यमांना कोणतीही प्रतिक्रिया न देता गाडीत बसून निघून जाणं पसंत केलं. त्यामुळे चौकशीत नेमकं काय प्रश्न विचारले, कोणकोणत्या मुद्द्यांवर चर्चा झाली, ते अद्याप समजू शकलेलं नाही. दुसरीकडे रोहित पवारांनी नवा दावा केल्याने या प्रकरणाबाबत आता नव्या घडामोडी घडणार का? ते पाहणं महत्त्वाचं आहे.

# खाद्यतेल, पेट्रोल-डिझेल कमी वापरण्याचं, सोने वर्षभर खरेदी न करण्याचं आवाहन, मुख्यमंत्र्याची पहिली प्रतिक्रिया

**जनसंचलन/मुंबई**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज हैदराबाद येथील जाहीर सभेत देशाच्या नागरिकांना अत्यंत मोलाचं आवाहन केलं आहे. नरेंद्र मोदी यांनी देशाच्या जनतेला वर्षभर सोने खरेदी न करण्याचं आवाहन केलं आहे. यासोबतच नरेंद्र मोदी यांनी देशाच्या जनतेला खाद्यतेलाचा वापर कमी करण्याचं आवाहन केलं आहे. तसेच पेट्रोल-डिझेलचा वापर कमी करण्याचं आवाहन मोदींनी केलं आहे. आवश्यक असेल तरच इंधनाचा वापर करण्याचं आवाहन मोदींनी केलं आहे. तसेच जास्त इंधन खर्च होऊ नये म्हणून वर्क फ्रॉम होम करा, सार्वजनिक वाहतुकीचा मार्ग निवडा, असं आवाहन मोदींनी केलं. नरेंद्र मोदी यांनी नैसर्गिक शेती आणि सौरऊर्जेचा जास्तीत जास्त वापर करण्याचं आवाहन केलं आहे. डिझेलपंपांचा वापर न करता सौरऊर्जेवर चालणारी पंप वापरण्याचं आवाहन मोदींनी केलं आहे. मोदी यांच्या या आवाहनानंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. जगात तेल आणि गॅसची कमतरता निर्माण झाली आहे. आपल्या बाजूच्या देशांमध्ये तर इतकी वाईट अवस्था आहे, इंधनाचे दर खूप मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. पाकिस्तानमध्ये पेट्रोलचे दर हे ४५० रुपये प्रतिलीटर इतके झाले आहेत. तरीही आपल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मोठ्या प्रमाणात आपल्या पुरवठ्या साखळीला फरक पडू दिला नाही. आपल्याला तेल, गॅस सर्व मिळत आहे. पण आपण या त्रासाला समजू शकलो नाहीत आणि त्याचा वापर चांगल्याप्रकारे करणार नाहीत तर मला असं वाटतं की आपल्यालाही अडचणींचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जे सांगितलं आहे त्याची संपूर्ण नागरिकांनी अंमलबजावणी करावी असं आवाहन देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जे सांगितले आहे ते अतिशय योग्य आहे. आपल्याला कल्पना आहे, खूप मोठ्या प्रमाणात अमेरिका, इस्त्रायल आणि इराणच्या युद्धामुळे जगामध्ये तेल आणि गॅसचा तुटवडा निर्माण झाला आहे. जगात अनेक देशांमध्ये लॉकडाऊन सुरु आहे. पाकिस्तान सारख्या देशात पेट्रोल मिळत नाही आणि जिथे मिळतोय तिथे त्याचा भाव ४५० रुपये केला आहे. अशाही परिस्थितीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे भारतात तेल आणि गॅस उपलब्ध होत आहे, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.



अशावेळी आपण त्याचा योग्य उपयोग केला नाही, आपण त्याचा मोठ्या प्रमाणात नाश केला, अधिकचा उपयोग केला तर आपल्यालाही अडचणींचा सामना करावा लागू शकतो. आवश्यकतेनुसारच उपयोग करण्याचं पंतप्रधान मोदींनी सांगितलं आहे ते सर्वांनी पाळावं, असं आमचं आवाहन आहेङ्कङ्क, अशी महत्त्वाची प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

# ...हिंदुस्थानी रागसंगीताचा मराठी अवतार...

साधारणत: हिंदुस्थानी रागसंगीत शिकणाऱ्या आणि ख्यालगायन करणाऱ्यांचा असा समज असतो की, मराठी भाषा कठोर आहे, फारशी संगीतानुकूल नाही. दुसराही अपसमज आहे की, महाराष्ट्राला कलासंगीताची स्वत:ची अशी खास परंपरा नाही, केवळ गेल्या शतकाभरातच रागसंगीत इथे रुजलं. मी स्वत: एक कलाकार असण्याबरोबरच संगीतसंस्कृती आणि इतिहास या दोन्हींचा अभ्यासक असल्यानं या विषयाचा धांडोळा घेतला, तेव्हा लक्षात आलं की सत्यस्थिती काहीशी निराळी आहे. मराठी भाषेत गीतप्रबंध गाण्याची परंपरा प्राचीन आहे. मध्ययुगीन संतकवींच्या अनेक रचना गेयप्रबंधांचे उत्तम नमुने आहेत; एवढंच नाही तर दासोपंत, रामदास यांच्या काही रचना तत्कालीन रागसंगीताचे ङ्गप्रबंधफ होते. पुढे पेशवेकालात बहराला आलेली बैठकीची लावणी ही विस्तारक्षम मराठी गीतिकाव्याचे सुंदर उदाहरण आहे. तंजावरच्या भोसले राजवटीत मराठी भाषेत कलासंगीताच्या रचना गायल्या जात असत. ख्यालगायकीचं केंद्रस्थान असणाऱ्या ग्वाल्हेरमध्ये अनेक मराठी गवैये होते, या ख्यालियांचा आश्रयदाता राजाही मराठी होता. साहजिकच तेथे मराठीत रागसंगीताच्या रचना निर्माण झाल्या. ग्वाल्हेरचे राजे माधवराव शिंदे सरकार (१८८६ ते १९२५) हे स्वत: मराठी काव्यरचना करत आणि त्यांचे दरबारगायक या रचना ख्यालाच्या रूपात पेश करत. बिलावल रागातली ङ्गशिवहरा हे भवहराफही मराठी बंदिश या सुंदर रचनांचं एक उत्तम उदाहरण आहे. बडोद्याला महाराज सयाजीराव गायकवाडांच्या पुढाकारानं सुरू झालेल्या संगीतशाळेचे मुख्याध्यापक मौलाबक्श आणि त्यांच्या शिष्यांनी प्रकाशित केलेल्या रचनासंग्रहांत रागदारीच्या मराठी रचनाही आहेत. गायनाचार्य वझेबुवा, मिराशीबुवा अशा गवैय्यांनी त्यांच्या बंदिशसंग्रहांत काही मराठी ख्यालांचे स्वरालेख दिले आहेत. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात ङ्गसंगीताचे मराठीकरणफ असा वाद गाजला. त्यात पलुसकर संप्रदाय, गोविंदराव टेंबे, ना. सी. फडके अशांनी संवादी-विवादी मते मांडली. त्यातून काही मराठी बंदिशी बांधल्या गेल्या, पाठ्यक्रमात समाविष्टही झाल्या. परन्तु या वादाचा कढ थंडावल्यावर मात्र मराठी बंदिशी शिकण्या-गाण्यातून कमी होत गेल्या. ग्वाल्हेरचे राजे माधवराव शिंदे सरकार (१८८६ ते १९२५) हे स्वत: मराठी काव्यरचना करत आणि त्यांचे दरबारगायक या रचना ख्यालाच्या रूपात पेश करत. बिलावल रागातली ङ्गशिवहरा हे भवहराफही मराठी बंदिश या सुंदर रचनांचं एक उत्तम उदाहरण आहे. बडोद्याला महाराज सयाजीराव गायकवाडांच्या पुढाकारानं सुरू झालेल्या संगीतशाळेचे मुख्याध्यापक मौलाबक्श आणि त्यांच्या शिष्यांनी प्रकाशित केलेल्या रचनासंग्रहांत रागदारीच्या मराठी रचनाही आहेत. गायनाचार्य वझेबुवा, मिराशीबुवा अशा गवैय्यांनी त्यांच्या बंदिशसंग्रहांत काही मराठी ख्यालांचे स्वरालेख दिले आहेत. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात ङ्गसंगीताचे मराठीकरणफ असा वाद गाजला. त्यात पलुसकर संप्रदाय, गोविंदराव टेंबे, ना. सी. फडके अशांनी संवादी-विवादी मते मांडली. त्यातून काही मराठी बंदिशी बांधल्या गेल्या, पाठ्यक्रमात समाविष्टही झाल्या. परन्तु या वादाचा कढ थंडावल्यावर मात्र मराठी बंदिशी शिकण्या-गाण्यातून कमी होत गेल्या. एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात उत्तर भारतातले अनेक घरंदाज ख्यालिये आले, आणि नाट्यसंगीतासारख्या एतद्देशीय संगीतप्रकारांतूनही रागसंगीताचं आणि विशेषत: ख्यालगायकीचं सार्वत्रीकरण सुरू झालं; तेव्हा विष्णु दिगंबर पलुसकर, त्यांचे विनायकबुवा पटवर्धनांसारखे शिष्य मराठीतून रागसंगीत मांडू पाहत होते. त्याच काळात महाराष्ट्रात नाट्यगीत, भावगीत आणि मग चित्रपटगीत हे मराठी भाषांतल्या गीतरचनांचे तीन संगीतप्रकार निर्माण झाले. शंभर वर्षांपूर्वी मराठी काव्य हे केवळ वृत्त-छंदांच्या पारंपरिक चालींत ङ्गकवितापठणफ करून मांडण्याच्या मर्यादित स्वरूपात नव्हतं; तर ख्याल, ठुमरीच्या अंगानंही ङ्गकाव्यगायनफ केलं जाई. बाई सुंदराबाई, हिराबाई बडोदेकर, केशवराव भोळे, बापूराव पेंढारकर, जी. एन्. जोशी, इ. गायक अशा तऱ्हेचं मराठी ङ्गकाव्यगायनफ करत असत. यातूनच ङ्गमराठी भावगीतफ उदयाला आलं. त्या आरंभीच्या काळात जे. एल्. रानड्यांसारख्या गायकांनी गायलेल्या मराठी कविता म्हणजे रागाधारित विस्तारक्षम बंदिशीच नव्हेत काय? द. वि. पलुसकर, राम मराठे, कुमार गंधर्व, मल्लिकार्जुन मन्सूर, बसवराज राजगुरू अशा ख्यालियांनी गायलेली काही भावगीतं म्हणजे खरं तर मराठी बंदिशीच आहेत. विनायकराव पटवर्धन, शंकरराव व्यास, कृ. ग. मुळे, ना. द. तांबे, मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर, शंकरराव प्रवर्तक इत्यादींनी मराठी बंदिशी बांधल्या; तर ना. मो. खरे व गोविंदराव टेंबे यांनी मराठी भाषेत राग-लक्षणगीतं रचली. मात्र या साऱ्यांचा रोख रागसंगीत मातृभाषेतून शिकवण्याकडे अधिक होता. मुख्यत्वे शैक्षणिक उद्देशानं ह्या मराठी बंदिशी केल्यानं त्या मैफिलींत अभावानेच गायल्या गेल्या. त्यांचं स्वरूप गायकीकेंद्रित न राहता अधिकतर बाळबोध राहिलं. सांगीतिक मूल्यापेक्षा तेथे उपदेशपरतेवर भर दिला गेल्यामुळे मैफली गाजवणाऱ्या कलाकारांनी या बंदिशींकडे दुर्लक्ष केलं, दुर्दैवानं त्यांची टिंगलही केली गेली. खरं तर गवैयांनी अशा बंदिशींपैकी मैफिलीत मांडण्याजोग्या बंदिशी निवडून त्या योग्य रीतीने गायल्या असत्या तर त्या ङ्गबाळबोधफ राहिल्या नसत्या. इथे कलावंतांच्या संकुचित वृत्तीने या बंदिशकारांवर, बंदिशींवर आणि पर्यायाने मराठी भाषेत रागसंगीत गाण्याच्या मूळ भूमिकेवरच अन्याय झाला असं म्हणावं लागतं.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# “परिणाम भोगावे लागतील”, पाक लष्कर प्रमुख असीम मुनीरकडून भारताला धमकी

**इस्लामाबाद/वृत्तसंस्था**

'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान भारताकडून मानहानीकारक पराभव पत्करल्यानंतर बरोबर एका वर्षाने पाकिस्तानचे चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ आणि लष्करप्रमुख फील्ड मार्शल असीम मुनीर यांनी रविवारी भारताला पुन्हा धमकी दिली आहे. पाकिस्तानविरुद्ध भविष्यात कोणतेही दुःसाहस केल्यास शत्रूला त्याचे अत्यंत व्यापक, धोकादायक, दूरगामी आणि वेदनादायक परिणाम भोगावे लागतील, असा इशारा त्यांनी दिला आहे.

रावळपिंडीतील जनरल हेडक्वार्टरमध्ये आयोजित एका कार्यक्रमात मुख्य अतिथी म्हणून बोलताना मुनीर यांनी ही धमकी दिली. यावेळी हवाई दल प्रमुख एअर चीफ मार्शल झहीर अहमद बाबर सिद्धू आणि नौदल प्रमुख ॲडमिरल नावेद अश्रफ यांचीही उपस्थिती होती. सभेला संबोधित करताना मुनीर म्हणाले, “आमच्या शत्रूंनी हे लक्षात ठेवावं की, भविष्यात पाकिस्तानविरुद्ध कोणतेही दुःसाहस करण्याचा प्रयत्न केला गेला, तर युद्धाचा प्रभाव मर्यादित राहणार नाही, तर तो अत्यंत व्यापक, धोकादायक, दूरगामी आणि वेदनादायक असेल.”



भाषणाच्या सुरुवातीला त्यांनी हा दिवस पाकिस्तान, तेथील जनता आणि सशस्त्र दलांसाठी अभिमानाचा स्रोत असल्याचे म्हटले. मुनीर यांनी असा दावा केला की, ६-७ मे आणि १० मे च्या मध्यरात्री पाकिस्तानचे सार्वभौमत्व आणि प्रादेशिक सीमांचे उल्लंघन करून शत्रूने आमच्या संकल्पाची परीक्षा घेण्याचा अयशस्वी प्रयत्न केला होता, ज्याला पूर्ण राष्ट्रीय एकता आणि लष्करी बळाने उत्तर देण्यात आले. लष्करप्रमुखांनी पुढे असेही म्हटले की, दोन्ही बाजूंमधील हा संघर्ष केवळ दोन देश किंवा सैन्यांमधील पारंपारिक युद्ध नव्हते, तर प्रत्यक्षात ते दोन विचारधारांमधील निर्णायक 'मार्का' (युद्ध) होते, यामध्ये अल्लाहच्या कृपेने सत्याचा विजय झाला आणि असत्याचा पराभव झाला. “ते पुढे म्हणाले, “२००१, २००८, २०१६ आणि २०१९ मधील 'फॉल्स फ्लॅग ऑपरेशन्स' हा पुरावा आहे की, भूतकाळातही भारताने पाकिस्तानवर बेकायदेशीर युद्ध लादण्याचे आणि आरोप, अतिशयोक्ती, युद्धखोरी आणि मर्यादित आक्रमकतेच्या दिशाभूल करणाऱ्या कल्पनेद्वारे संकुचित, दीर्घकालीन राजकीय आणि लष्करी उद्दिष्टे साध्य करण्याचे अयशस्वी प्रयत्न केले आहेत.” आपल्या इशाऱ्याचा पुनरुच्चार करताना मुनीर यांनी पुन्हा एकदा सांगितले की, जर “पाकिस्तानच्या शत्रूंनी” भविष्यात अशी कोणतीही हालचाल केली, तर युद्धाचे परिणाम मर्यादित राहणार नाहीत.

गेल्या वर्षभरात मुनीर यांनी नवी दिल्लीला दिलेली ही पहिलीच धमकी नाही. गेल्या डिसेंबरमध्ये चीफ ऑफ डिफेन्स फोर्सेस (CDF) पदी बढती मिळाल्यानंतर त्यांनी भारताला पाकिस्तानच्या युद्धसज्जतेबद्दल कोणताही भ्रम न ठेवण्याचा इशारा दिला होता आणि अधिक जलद, अधिक गंभीर आणि अधिक तीव्र प्रत्युत्तर देण्याचे आश्वासन दिले होते. त्यापुढे जाऊन त्यांनी सिंधू नदीवरील भारतीय पायाभूत सुविधा आणि धरणांना लक्ष्य करण्याची धमकीही दिली होती. ऑगस्टमध्ये अमेरिकेतील अनिवासी पाकिस्तानींच्या एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी कथितपणे म्हटले होतं की, “आम्ही एक अण्वस्त्रधारी राष्ट्र आहोत. जर आम्हाला वाटले की आमचा नाश होत आहे, तर आम्ही अर्ध्या जगाला आमच्यासोबत घेऊन जाऊ.”

गेल्या वर्षी एप्रिलमध्ये पहलगाममध्ये पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून 'ऑपरेशन सिंदूर' सुरू करण्यात आले होते. ७ मे रोजी भारताने रात्रभर केलेल्या हल्ल्यात पाकिस्तानव्याप्त जम्मू-काश्मीरमधील नऊ दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले होते. त्यानंतर पाकिस्तानने प्रत्युत्तर देण्याचा आणि ड्रोन हल्ल्यांचा प्रयत्न केला. परंतु १० मेपर्यंत, म्हणजेच इस्लामाबादने युद्धबंदीसाठी दिल्लीशी संपर्क साधण्याच्या एक दिवस आधी, भारताने पाकिस्तानच्या हवाई तळांवर आणि रडार केंद्रांसह लष्करी मालमत्ता आणि पायाभूत सुविधांवर अचूक हल्ले करून पाकिस्तानला गुडघ्यावर आणले होते.

## रत्नागिरीत भाजपचा आमदार आणि पालकमंत्री हवा, कार्यकर्त्यांनी कामाला लागा

**रत्नागिरी/वृत्तसंस्था**

“भाजप कार्यकर्त्यांनी आपापसात भांडू नये. रत्नागिरीत आपल्याला मोठी राजकीय लढाई लढायची आहे. आगामी २०२९ मध्ये रत्नागिरी जिल्ह्याचा पालकमंत्री भाजपचा असावा, तसेच जिल्ह्यात भाजपचा आमदार असावा असे वाटत असेल, तर आतापासून कामाला लागा,” असे आवाहन नवनिर्वाचित विधानपरिषदेचे भाजपा आमदार प्रमोद जठार यांनी केले. “सध्या कुंपणावर असलेलेही अनेक जण लवकरच भाजपमध्ये प्रवेश करतील,” असा दावा त्यांनी यावेळी केला.

विधानपरिषद आमदार म्हणून निवड झाल्यानंतर प्रमोद जठार यांनी भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे आभार मानण्यासाठी रत्नागिरी जिल्ह्याचा दौरा केला. त्यानिमित्त चिपळूण शहर व ग्रामीण मंडलातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी त्यांनी संवाद साधला. चिपळूणमधील मार्कंडी येथील भाजप संपर्क कार्यालयात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी रत्नागिरी दक्षिण जिल्हाध्यक्ष प्रशांत यादव, उत्तर रत्नागिरी जिल्हाध्यक्ष सतीश मोरे आणि संघटन मंत्री शैलेंद्र दळवी उपस्थित होते. भाजपच्या वरिष्ठ नेतृत्वाने आपल्यावर दाखवलेला विश्वास आपण सार्थ ठरवू, अशी ग्वाही देताना जठार यांनी पक्षाप्रती कृतज्ञता व्यक्त केली. “पालघर ते सिंधुदुर्ग या विस्तीर्ण पट्ट्यात तंटामुक्ती अध्यक्षासारखे काम करण्याची जबाबदारी पक्षाने माझ्यावर सोपवली आहे. पद आणि लोकप्रतिनिधित्व यात फरक असतो. दोन्ही मिळवण्यासाठी सातत्यपूर्ण मेहनत, पक्षनिष्ठा आणि नशिबाची साथ आवश्यक असते,” असे ते म्हणाले. पश्चिम बंगालमधील भाजपच्या वाढत्या प्रभावाचा उल्लेख करताना त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने अनेक राज्यांत यश मिळवले असल्याचे सांगितले. “पश्चिम बंगालमध्ये भाजपची सत्ता यावी यासाठी अनेक कार्यकर्त्यांनी अपार मेहनत घेतली.

## 'तामिळनाडूत नव्या युगाचा आरंभ'; विजय यांच्याकडून धडाकेबाज निर्णय; तरुण कीर्तनांनी वेधले लक्ष

**चेन्नई/वृत्तसंस्था**

तामिळनाडूचे मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांनी रविवारी मुख्यमंत्रिपदाचा कार्यभार स्वीकारताच राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक बोलावली. यात त्यांनी महिलांची सुरक्षा, अमली पदार्थांशी संबंधित धोरण याबाबत सूचना केल्या. अशा बैठका सातत्याने घेतल्या जातील, असेही त्यांनी सूचित केले.



राज्यपालांनी शपथ देण्यास प्रारंभकरताच विजय यांनी मध्येच आपली शक्ती सिद्ध करण्यासाठी भाषण सुरू केले. राज्यपालांच्या लक्षात येताच त्यांनी हस्तक्षेप करीत शपथविधीचे मूळ प्रारूप कायम ठेवून अधिकृत शपथ घेण्याची सूचना विजय यांना केली. शपथ घेतल्यानंतर उजवा हात उंचावून त्यांनी शक्तीचे प्रतीक दाखवले. राज्यात सत्तेचे एकच केंद्र असेल. आपल्या सरकारमध्ये आपणच एकमेव 'सत्ता केंद्र' असू, असे विजय यांनी रविवारी स्पष्ट केले. मुख्यमंत्री म्हणून केलेल्या पहिल्या भाषणात त्यांनी राज्यात नव्या युगाचा प्रारंभ झाला असल्याचे नमूद केले. तमिळनाडूचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेताच पंतप्रधान मोदी यांनी विजय यांना दूरध्वनीवरून शुभेच्छा दिल्या. जनतेच्या कल्याणासाठी तसेच विकासासाठी तमिळनाडू सरकारसोबत एकत्रितपणे काम करण्यास केंद्र सरकार कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. विजय यांच्या मंत्रिमंडळातील सर्वात तरुण महिला मंत्री २९ वर्षीय कीर्तना यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. अस्खलित हिंदी बोलत 'आता सरकार कसे चालवले जाते हे आम्ही जगाला दाखवून देऊ', असे त्या म्हणाल्या. तमिळसह पाच भाषा अवगत असलेल्या कीर्तना यांनी आय-पॅक व शोटाईम कन्स्टल्टिंगसारख्या कंपन्यांत डिजिटल रणनीतीकार म्हणून काम केले आहे.

टीव्हीकेचे अध्यक्ष व मुख्यमंत्री जोसेफ विजय यांच्या शपथविधीच्या वेळी सर्वप्रथम 'वंदे मातरम', त्यानंतर 'जन गण मन' आणि शेवटी 'तमिळ थाई वाझ्थू' हे राज्याचे गीत गाण्यात आले. यावरून भाकपने तीव्र नाराजी व्यक्त केली. 'वंदे मातरम्' हे गीत एका विशिष्ट देवतेला समर्पित असल्याचे व यात सांप्रदायिक धार्मिक चरित्राचा उल्लेख असल्याचे माकपचे राज्य सचिव एम. वीरपांडियन यांनी म्हटले आहे.

## युद्धाचं सावट पुन्हा गडद झालं; अमेरिकेनं इराणचा प्रस्ताव फेटाळला, पेट्रोल-डिझेलचा तुटवडा

**वॉशिंग्टन/वृत्तसंस्था**

अमेरिका-इस्रायल-इराणदरम्यान दोन महिन्यांहून अधिक काळ सुरू असलेले युद्ध संपविण्यासाठी अमेरिकेने दिलेल्या प्रस्तावाला इराणने मध्यस्थीची भूमिका बजावत असलेल्या पाकिस्तानकडे उत्तर पाठविले आहे. इराणच्या 'आयआरएनए' वृत्तसंस्थेने रविवारी ही माहिती दिली. मात्र, हा प्रस्ताव अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना अस्वीकार्य आहे. याबाबत त्यांनी ट्रूथ या सोशल मीडियावर पोस्ट करत माहिती दिली. दरम्यान, पश्चिम आशियाती हा संघर्ष असाच सुरू राहिल्यास जगभरातील इंधन पुरवठा साखळी विस्कळीत होण्याची शक्यता आहे. याबाबत भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कालच (१० मे) देशातील जनतेला काटकसर करण्याचे आवाहन केले आहे.



'ट्रुथ सोशल'वर पोस्ट करताना ट्रम्प म्हणाले की, तेहरानच्या प्रतिनिधींनी पाठवलेल्या संदेशाचा त्यांनी आढावा घेतला आहे, परंतु ते यामुळे प्रभावित झालेले नाहीत. प्रतिसादातील तपशीलांचा उल्लेख न करता त्यांनी लिहिले, “मला हे आवडलेले नाही.”

वॉशिंग्टन आणि इराण यांच्यात शांतता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न गेल्या काही आठवड्यांपासून मंदावले आहेत, तरीही पर्शियन गल्फमध्ये दोन्ही बाजूंनी लष्करी चकमकी सुरूच आहेत. तात्पुरती युद्धबंदी जाहीर होऊन एक महिन्याहून अधिक काळ उलटला असला तरीही हा तणाव कायम आहे. ही युद्धबंदी धोरणात्मकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे असलेले 'होर्मुझची सामुद्रधुनी' (Strait of Hormuz) पुन्हा खुली करण्यासाठी करण्यात आली होती. इराणने या सामुद्रधुनीतून होणारी जहाजांची वाहतूक रोखणे सुरूच ठेवल्यामुळे जागतिक ऊर्जा बाजारपेठेत अनिश्चितता वाढली आहे. ही सामुद्रधुनी जागतिक तेल वाहतुकीचा मुख्य मार्ग आहे. अमेरिकन अधिकाऱ्यांच्या मते, त्यांच्या मुख्य मागण्या बदललेल्या नाहीत, ज्यामध्ये मुक्त सागरी वाहतूक पूर्ववत करणे आणि इराणच्या अण्वस्त्र महत्त्वाकांक्षेला आळा घालणे यांचा समावेश आहे. ऊर्जा सचिव ख्रिस राइट यांनी एका मुलाखतीत सांगितले की, वॉशिंग्टन तेहरानकडून स्पष्ट तोडग्याची वाट पाहत आहे. ते म्हणाले, “जेव्हा होर्मुझच्या सामुद्रधुनीतून वाहतूक सुरळीत सुरू होईल, तेव्हा ऊर्जेच्या किमती कमी होतील.” दरम्यान, संयुक्त राष्ट्रातील अमेरिकेचे राजदूत माईक वॉल्ट्झ यांनी मान्य केले की, वाटाघाटी अपेक्षेपेक्षा “दीर्घ आणि संथ” चालल्या आहेत, परंतु मुत्सद्दी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले.


अमेरिकेने इराणच्या तेल निर्यातीला लक्ष्य करणारी नौदलाची नाकेबंदी कायम ठेवली आहे, जी इराणच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानली जाते. गुप्तचर मूल्यमापनानुसार, इराणची व्यवस्था तातडीने कोलमडून न पडता असा दबाव अनेक महिने सहन करू शकते. एका वेगळ्या मुलाखतीत ट्रम्प यांनी आग्रह धरला की हा संघर्ष संपण्यापासून अजून लांब आहे. ते म्हणाले, “जर मला सर्वोत्तम करार करता येत नसेल, तर मला तिथे पोहोचण्यात रस नाही. आपण (कराराच्या) बऱ्यापैकी जवळ आहोत.”

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पोलिसांचं नगरसेवकांना आमंत्रण, MIM च्या मतीन पटेलवर 'बॉम्ब', निदा खान फ्लॅटवर सापडली

■ नाशिक/वृत्तसंस्था



बहुराष्ट्रीय कंपनीतील धर्मांतर प्रकरणातील संशयित निदा खान छत्रपती संभाजीनगरातील दाट लोकवस्तीत लपल्याची खात्री असलेल्या नाशिक पोलिसांना तिला पाठिंबा देणारा 'नगरसेवक' हेरायचा होता. तेथील महापालिकेच्या नगरसेवकांना 'तुमच्या सुरक्षेबाबत आढावा घ्यायचाय', असे असे सांगून पोलिसांनी बोलावले. संशयित मतीन पटेल याच्याशी चर्चेवेळी पोलिसांनी थेट पुराव्यांचा 'डाव' टाकला. यानंतर घाबरलेल्या नगरसेवकाने 'पत्ता' उघडला आणि 'ऑपरेशन सुरक्षा तपासणी'तून संशयित निदा खानचा 'गेम ओव्हर' झाला.बहुराष्ट्रीय कंपनीतील पीडितेवर अत्याचार, विनयभंग आणि धर्मांतराच्या प्रयत्नाचा नाशिकच्या देवळाली कॅम्प पोलिसांत २६ मार्च रोजी पहिला गुन्हा दाखल झाल्यापासून निदा एजाज खान पसार होती. कंपनीतील विविध प्रकरणांत दाखल नऊ गुन्ह्यांत आठ संशयितांना अटक झाल्यानंतर निदाने नाशिकरोड न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला. २ मे रोजी न्यायालयाने जामीन फेटाळल्याने तिच्या अडचणीत वाढ झाली.नाशिक शहराचे पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांनी विशेष तपास पथकाला (एसआयटी) तातडीने निदाला ताब्यात घेण्याची सूचना केली. तांत्रिक विश्लेषणानुसार छत्रपती संभाजीनगरातल्या एका फ्लॅटमध्ये निदा लपल्याचे स्पष्ट झाले. आयुक्त कर्णिक यांनी छत्रपती संभाजीनगरचे पोलिस आयुक्त प्रवीण पवार यांना कळविल्यानंतर तेथील गुन्हे शाखेनेही गोपनीय पद्धतीने कारवाई सुरू केली. दोन्ही शहरांच्या पोलिसांनी संयुक्तपणे 'ऑपरेशन सुरक्षा आढावा' सुरू केल्यावर अवघ्या काही तासांत निदाला ताब्यात घेण्यात आले.

गुन्हा नोंद झाल्यापासून निदा खान मुंब्रामध्ये होती. तिच्या पतीचा एप्रिल महिन्यात 'एसआयटी' ने जबाब नोंदवला होता. पसार झालेल्या निदाबाबत 'एमआयएम'च्या वरिष्ठ नेत्यांनी काही दिवसांपूर्वी निदासोबत संवाद झाल्याचे वक्तव्य केले. तेथून तपासाची सुई 'एमआयएम' भोवती फिरली. छत्रपती संभाजीनगरातील 'एमआयएम'चा नगरसेवक संशयित मतीन माजिद पटेल याने निदाला आश्रय दिल्याचे पोलिसांना समजले. मंगळवारी (दि. ५) 'एसआयटी' चे एसीपी संदीप मिटके यांनी नाशिकहून दोन पथके रवाना केली. अतिसंवेदनशील कारवाईमुळे अतिरिक्त मदत मिळण्यासाठी 'बॅकअप प्लॅन' सह पथके सज्ज होती. कोणालाही संशय नको म्हणून छत्रपती संभाजीनगरातील बहुतांश नगरसेवकांना एकत्रित बोलवले. सुरक्षेचा आढावा घेत असल्याचे सांगत बुधवारी (दि. ६) अनेकांशी पोलिसांनी चर्चा केली. खासगी सुरक्षारक्षक सोबत ठेवणारा मतीन हा असुरक्षिततेच्या भीतीपोटी पोलिसांच्या निमंत्रणानुसार तेथे पोहोचला होता. संशयित मतीनसमोर पोलिसांनी योग्य डाव टाकल्यावर निदाचा पत्ता सांगण्यावाचून कोणताही पर्याय त्याच्याकडे शिल्लक नव्हता. त्याने दिलेल्या महितीनुसार पुन्हा अंडरकव्हर पोलिसांनी संबंधित फ्लॅटमध्ये जात निदाला ताब्यात घेत तिला आश्रय दिल्यामुळे मतीनवर गुन्हा नोंदवला आहे.

नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर शहर पोलिसांनी केलेल्या संयुक्त कारवाईत संशयित निदा खान हिला नेरेगावातून ताब्यात घेतले. तिला आश्रय दिलेल्या नगरसेवकालाही संशयित केले आहे. गुन्ह्यात सखोल तपासाचे आदेश दिले असून, सहभाग निष्पन्न होणाऱ्या प्रत्येकावर कारवाई होईल.

## कुणी नवरदेवाचे बूट लपवले, कुणी नवरीची चप्पल पळवली, किरकोळ कारणावरुन हाणामारी

■ जालना/वृत्तसंस्था

जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील नांदी गावात एका लग्नसमारंभात नवरदेवाचा बूट आणि नवरीची चप्पल पळवण्याच्या किरकोळ कारणावरून वधू आणि वर पक्षातील मंडळींमध्ये तुफान राडा झाल्याची घटना समोर आली आहे. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात दोन्ही गटांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, काल गुरुवारी रोजी नांदी गावात एका विवाह सोहळ्यादरम्यान पारंपरिक पद्धतीने वधू पक्षातील काही तरुणींनी आणि नातेवाईकांनी नवरदेवाचा बूट लपवला. तर दुसऱ्या पक्षातील तरुणी आणि नातेवाईकांनी नवरीची चप्पल पळवली. लग्नातील ही थट्टा-मस्करीची परंपरा अनेक ठिकाणी पाहायला मिळते. सुरुवातीला हसत-खेळत सुरू असलेला हा प्रकार काही वेळातच वादात परिवर्तित झाला. बूट परत देण्यावरून दोन्ही बाजूंमध्ये शाब्दिक चकमक सुरू झाली आणि त्याचे रूपांतर थेट हाणामारीत झाले. व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये वधू आणि वर पक्षातील काहीजण एकमेकांना धक्काबुक्की करताना तसेच मारहाण करताना दिसून येत आहेत. लग्नसमारंभात उपस्थित असलेल्या महिलांसह नातेवाईकांमध्येही गोंधळ उडाल्याचं दिसत आहे. काहींनी हा वाद मिटवण्याचा प्रयत्न केला. मात्र, वातावरण अधिकच तापल्यानं लग्नसोहळ्याला गालबोट लागलं.

घटनेनंतर परिसरात काहीकाळ तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं. या प्रकरणाची माहिती अंबड पोलिसांना मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. दोन्ही गटांनी एकमेकांविरोधात तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी परस्परविरोधी गुन्हे दाखल केले आहेत. दरम्यान, लग्नासारख्या आनंदाच्या प्रसंगी छोट्या कारणावरून झालेल्या या राड्याची चर्चा संपूर्ण जिल्ह्यात रंगली आहे.

## पिंपरी-चिंचवडमध्ये एकतर्फी प्रेमाचा शेवट

**चिंचवड :** पिंपरी- चिंचवडमध्ये एकतर्फी प्रेमातून थरारक हत्याकांड घडलं आहे. पाच महिन्यांपूर्वी ज्या तरुणाने आपल्या प्रेयसीवर जीवघेणा हल्ला केला होता, त्याच तरुणाची आता चाकू आणि चॉपरने हत्या करण्यात आली आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून काळेवाडी पोलिसांनी अवघ्या काही तासांत दोन आरोपींना अटक केली आहे.मृत तरुणाचं नाव सुभान अमित शेख असं आहे. सुभानचं शहरातील एका तरुणीवर एकतर्फी प्रेम होतं. मात्र, सदर तरुणी त्याला सातत्याने नकार देत होती. या नात्याला तरुणीच्या आईचाही तीव्र विरोध होता. पोलिसांच्या माहितीनुसार, पाच महिन्यांपूर्वी सुभानने संतापाच्या भरात तरुणीवर चाकूने वार करत तिच्या हत्येचा प्रयत्न केला होता. त्या प्रकरणात त्याला अटक करण्यात आली होती आणि तो जेलमध्ये होता.दरम्यान, अवघ्या पाच दिवसांपूर्वीच सुभान जामिनावर जेलमधून बाहेर आला होता. तो पुन्हा आपल्या मुलीला इजा पोहोचवू शकतो, अशी भीती सदर तरुणीच्या आईला वाटत होती.

## भारताच्या सार्वजनिक आरोग्याला हंटा व्हायरसचा किती धोका?

■ नवी दिल्ली/वृत्तसंस्था

एका जहाजावरील दोन भारतीय नागरिकांना 'हंटा व्हायरस'ची लागण झाल्याच्या वृत्ताने चिंता व्यक्त केली जात असतानाच, आयसीएमआर-नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ व्हायरोलॉजीचे (एनआयव्ही) संचालक डॉ. नवीनकुमार यांनी ही प्रकरणे वैयक्तिक स्वरूपाची असून भारताच्या सार्वजनिक आरोग्याला कोणताही तत्काळ धोका नाही, असे स्पष्ट केले आहे.डॉ. कुमार म्हणाले, की, 'सध्या या विषाणूचा समुदायात प्रसार झाल्याचा कोणताही पुरावा नाही. 'हंटा व्हायरस' प्रामुख्याने संक्रमित उंदीर किंवा त्यांच्या लाळ, लघवी आणि विष्ठा यांसारख्या उत्सर्जित पदार्थांच्या संपर्कात आल्याने मानवामध्ये पसरतो. गोदामे, जहाजे किंवा साठवणुकीच्या बंद जागांमध्ये जिथे उंदरांचा वावर असतो, तिथे हवेतील कणांद्वारे याचा संसर्ग होऊ शकतो,' असे त्यांनी स्पष्ट केले.डॉ. कुमार यांनी विशेष नमूद केले, की कोविड-१९ प्रमाणे 'हंटा व्हायरस' माणसाकडून माणसाला सहज पसरत नाही. केवळ दक्षिण अमेरिकेतील 'अँडीज' सारख्या काही विशिष्ट प्रजातींमध्येच मर्यादित मानवी प्रसार दिसून आला आहे. डब्ल्यूएचओचे महासंचालक टेड्रोस अधानोम घेब्रेयेसस यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत सांगितले, की ही घटना गंभीर असली तरी सार्वजनिक आरोग्यासाठीचा धोका सध्या कमी आहे. सहा एप्रिल रोजी एका पुरुष प्रवाशाला पहिल्यांदा लक्षणे दिसली आणि पाच दिवसांनी त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर २५ एप्रिल रोजी त्याच्या पत्नीचा आणि दोन मे रोजी तिसऱ्या महिलेचा मृत्यू झाला.

तपासात असे समोर आले आहे, की पहिल्या दोन मृतांनी जहाजावर चढण्यापूर्वी चिली, अर्जेंटिना आणि उरुग्वेमध्ये पक्षीनिरीक्षण मोहिमेत सहभाग घेतला होता. या भागात हंटा व्हायरस वाहक उंदरांचे अस्तित्व अधिक आहे. हंटाव्हायरसचा उबवणी काळ सहा आठवड्यांपर्यंत असल्याने नवीन रुग्ण आढळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## रुग्णवाहिकेतून परीक्षा देऊन नाशिकच्या हर्षलने 10वीत मिळवले 77 टक्के

■ नाशिक/वृत्तसंस्था



ऐन परीक्षेदरम्यान झालेला अपघात... दुखापत झालेल्या पायाची असह्य वेदना... तशाच अवस्थेत दिलेले दहावीचे पेपर आणि त्यानंतर ७७.६० टक्के गुणांसह मिळविलेले यश, हा घटनाक्रम म्हणजे चौधरी कुटुंबासाठी एका वेदनेपासून आनंदापर्यंतचा प्रवास. हर्षल चौधरी या विद्यार्थ्याने अपघातानंतरही पेपर देत दहावीत हे यश मिळविले असून, त्याच्या या यशाने जिद्द असेल, तर कोणत्याही परिस्थितीवर मात करता येत हेच जणू अधोरेखित केले आहे.हर्षल चौधरी हा मूळचा जळगाव जिल्ह्यातील धरणगाव तालुक्यातील शेतकरी कुटुंबातील विद्यार्थी. शिक्षणासाठी नाशिकमधील आपले काका किरण चौधरी यांच्याकडे राहणारा हा हर्षल 'रुद्रा द प्रॅक्टिकल स्कूल'चा विद्यार्थी. दहावीच्या परीक्षेसाठी त्याचा 'मविप्र'च्या जनता विद्यालयात नंबर आला होता. दहावीच्या परीक्षेचे तीन पेपर बाकी असताना सायकलला दुचाकीने धक्का दिल्यामुळे पायाला गंभीर दुखापत झाली. ऑपरेशनशिवाय पर्याय नाही हे समजताच घरचे, शिक्षक यांनी त्याच्यासमोर जून-जुलै महिन्या पुरवणी परीक्षा देण्याचा पर्याय ठेवला. परंतु, हर्षलने उर्वरित पेपर देण्याचा निर्णय घेतला. शाळेतील निवेदिता महाजन व सोनाली कारंडे या शिक्षिकांनी त्याच्या या निर्णयाला पाठिंबा देत परीक्षा केंद्राशी समन्वय साधला. दुसऱ्याच दिवशी विज्ञानाचा पेपर असल्याने ऑपरेशन करणे शक्य नव्हते. अशावेळी असह्य वेदना सहन करीत हर्षलने रुग्णवाहिकेतून हा पेपर दिला. त्यानंतर शस्त्रक्रिया करून रुग्णवाहिकेतूनच त्याने इतिहास व भूगोल हे पेपर दिले. मानव पाटील या विद्यार्थ्याने लेखनिक म्हणून काम केले. हर्षलला सीए व्हायचे आहे.परीक्षेपूर्वी माझा अभ्यास पूर्ण होता. अचानक अपघात झाल्याने सगळे तणावात होते. पण, मला मात्र परीक्षा द्यायचीच होती. माझ्या पालकांपासून, शिक्षक, राज्य मंडळ परीक्षा केंद्र सर्वांनी माझी अडचण समजून मला सुविधा उपलब्ध करून दिल्या.

कर्णबधिर असूनही सर्वेश तांडेलने स्वतःसाठी कोणताही सोपा मार्ग निवडला नाही.

अभ्यासक्रम स्वतंत्र घेण्याऐवजी त्याने सामान्य विद्यार्थ्यांप्रमाणेच विषयांची निवड केली आणि मेहनतीच्या जोरावर यश मिळविले. दहावीच्या परीक्षेत ६७टक्के गुण मिळवत सर्वेशने शाळेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. आता त्याला वाणिज्य शाखेत प्रवेश घेऊन करिअर घडवायचे आहे. संवादाच्या मर्यादा असल्या, तरी आत्मविश्वास आणि जिद्दीच्या जोरावर कोणतेही ध्येय गाठता येते, हे सर्वेशने सिद्ध करून दाखवले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मुंबई इंडियन्स IPL मधून बाहेर! RCB चा थरारक विजय; कृणाल पंड्या ठरला विजयाचा हिरो







**मुंबई, वृत्तसंस्था :**

आयपीएल २०२६ स्पर्धेतील ५४ वा सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि मुंबई इंडियन्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. रायपूरच्या मैदानावर पार पडलेल्या या सामन्यात दोन्ही संघांमध्ये अटीतटीची लढत पाहायला मिळाली. मुंबई इंडियन्सने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघासमोर विजयासाठी १६७ धावांचे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना मुंबईने सुरुवातीला रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला मोठे धक्के दिले. पण शेवटी कृणाल पंड्या खंबीरपणे उभा राहिला. गेल्या सामन्यातही कृणाल पंड्याने शेवटपर्यंत झुंज दिली होती. पण विजय थोडक्यात हुकला होता. पण यावेळी त्याने आपल्या जुन्या संघाविरुद्ध खेळताना दमदार अर्धशतकी खेळी केली. दरम्यान शेवटच्या षटकात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने हा सामना २ गडी धावा राखून आपल्या नावावर केला.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला हा सामना जिंकण्यासाठी १६७ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना विराट कोहली शून्यावर माघारी परतला. तर जेकब बेथेलने २७ धावांची खेळी केली. देवदत्त पडिक्कलने १२ धावांची खेळी केली. रजत पाटीदारने ८ धावा केल्या. पण कृणाल पंड्याने सामना फिरवला. त्याने ७३ धावांची खेळी केली. जितेश शर्मा १८ धावा करून माघारी परतला. शेवटच्या षटकात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने हा सामना २ गडी राखून विजय मिळवला.

या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने नाणेफेक जिंकून मुंबई इंडियन्सला प्रथम फलंदाजी करण्याचं आमंत्रण दिलं होतं. हा निर्णय रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या गोलंदाजांनी योग्य ठरवला. मुंबईला सुरुवातीलाच मोठे धक्के दिले. रायन रिकल्टन अवघ्या २ धावा करून माघारी परतला. तर रोहित शर्माने २२ धावा करून पॅव्हेलियनची वाट धरली. सूर्यकुमार यादव गोल्डन डकवर माघारी परतला. त्यानंतर नमन धीर आणि तिलक वर्माने मिळून मुंबईचा डाव सांभाळला. नमन धीरने ३२ चेंडूत ४७ धावा चोपल्या. तर तिलक वर्माने ४२ चेंडूत ५७ धावा चोपल्या. या खेळीच्या बळावर मुंबईने सामन्यात पुनरागमन केलं. विल जॅक्स अवघ्या १० धावांवर बाद झाला. तर राज अंगद बावाने १६ धावांचे योगदान देत संघाची धावसंख्या ७ गडी बाद १६६ धावांवर पोहोचवली.

या पराभवासह मुंबई इंडियन्सचा संघ आयपीएल २०२६ स्पर्धेतून बाहेर पडला आहे. मुंबईने ११ सामन्यांपैकी ८ सामने गमावले आहेत. तर केवळ ३ सामन्यांमध्ये विजय मिळवला आहे. मुंबईला केवळ ६ गुणांची कमाई करता आली आहे. तर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुने ११ सामन्यांपैकी ७ सामने जिंकले आहेत. तर ४ सामन्यांमध्ये पराभवाचा सामना करावा लागला आहे. १५ गुणांसह रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुचा संघ गुणतालिकेत अव्वल स्थानी आहे.

## जोस इंग्लिसने किपरच्या डोक्यावरून खेचले खणखणीत षटकार

**मुंबई /वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६ स्पर्धेत आज डबल हेडर सामन्यांचा थरार रंगणार आहे. पहिला सामना चेन्नई सुपर किंग्ज आणि लखनौ सुपर जायंट्स या दोन्ही संघांमध्ये सुरू आहे. चेपॉकच्या मैदानावर सुरू असलेल्या या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या लखनौ सुपर जायंट्स संघाकडून जोस इंग्लिसने वादळी सुरुवात करून दिली. त्याने अवघ्या ३३ चेंडूत ८५ धावा कुटल्या. यादरम्यान त्याने अंशूल कंबोज आणि मुकेश चौधरीच्या गोलंदाजीवर २ खणखणीत शॉट खेचले. ज्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.



चेन्नईतील चेपॉकच्या मैदानावर सुरू असलेल्या या सामन्यात लखनौ सुपर जायंट्स संघाला प्रथम फलंदाजी करण्याचं आमंत्रण मिळालं. डावाची सुरुवात करताना जोस इंग्लिस चेन्नईचा गोलंदाजांवर तुटून पडला. त्याने अवघ्या ३३ चेंडूंचा सामना करत १० चौकार आणि ६ गगनचुंबी षटकार खेचले. त्याच्याकडे शतक झळकावण्याची संधी होती. पण हे शतक अवघ्या १५ धावांनी हुकलं. पण त्याने पावरप्लेच्या आधीच संघाची धावसंख्या ७० धावांच्या पार पोहोचवली होती. जोस इंग्लिस आपल्या तुफान फटकेबाजीसाठी ओळखला जातो.

या डावातही त्याची तुफान फटकेबाजी पाहायला मिळाली. त्याने यष्टिरक्षण करत असलेल्या संजू सॅमसनच्या डोक्यावरून २ षटकार खेचले. तर झाले असे की, चेन्नईकडून दुसरे षटक टाकण्यासाठी मुकेश चौधरी गोलंदाजीला आला.

## नेहराचा मास्ट्ररस्ट्रोक! वैभव सूर्यवंशीला बाद करण्यासाठी डगआऊटमधून केला एक इशारा, सिराजने घेतली विकेट

**जयपूर/वृत्तसंस्था**

वैभव सूर्यवंशीने IPL 2026 मध्ये आपला तडाखेबाज फॉर्म कायम ठेवत गुजरात टायटन्सविरुद्ध अवघ्या १३ चेंडूत ३६ धावांची वादळी खेळी केली. मात्र २३० धावांच्या मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना सूर्यवंशीकडून मोठ्या खेळीची अपेक्षा असताना तो बाद झाला. मोहम्मद सिराजने हुशार गोलंदाजी करत त्याला जाळ्यात अडकवलं. पण सूर्यवंशीच्या विकेटमागे खरा मास्टरस्ट्रोक कोच आशिष नेहराचा होता, ज्याचा व्हीडिओ व्हायरल झाला आहे.



संपूर्ण हंगामात सूर्यवंशीने राजस्थानला आक्रमक सुरुवात करून दिली आहे. गुजरातविरूद्ध सामन्यातही त्याने दणक्यात सुरूवात करत गोलंदाजांची शाळा घेतली. मात्र सिराजने संयम राखत महत्त्वाचा ब्रेकथ्रू मिळवला. सिराजने टाकलेल्या शॉर्ट चेंडूवर सूर्यवंशी गोंधळला आणि टॉप-एज लागत चेंडू शॉर्ट फाइन लेगकडे झेलबाद झाला. वैभव सूर्यवंशीच्या विकेटनंतर राजस्थानचा डाव पत्त्यांसारखा कोसळला. अखेरीस राजस्थान रॉयल्सला फक्त १५२ धावांपर्यंत मजल मारता आली आणि संघाला ७७ धावांनी पराभव स्वीकारावा लागला.

वैभव सूर्यवंशीने बाद होण्यापूर्वी मोहम्मद सिराजची चांगलीच धुलाई केली होती. सिराजच्या पहिल्या षटकातील पहिल्या चेंडूवर षटकार लगावला होता. सूर्यवंशीने त्याच्या एका षटकात एक षटकार आणि तीन चौकार लगावले होते, त्यामुळे सिराज दबावाखाली दिसत होता. मात्र त्याच वेळी आशिष नेहराने डगआऊटमधून सूत्र हलवली. व्हायरल झालेल्या एका व्हिडिओमध्ये नेहराने सिराजला सूर्यवंशीच्या शरीरावर, विशेषतः डोक्याजवळ चेंडू टाकण्याचा इशारा केला. सिराजने ती रणनिती अचूक रितीने अमलात आणत गुजरातसाठी धोकादायक ठरत असलेल्या वैभव सूर्यवंशीची महत्त्वाची विकेट मिळवली. आशिष नेहराच्या या मास्ट्ररस्ट्रोकने सर्वांचं लक्ष वेधलं आहे. Gujarat Titans ने IPL 2026 मध्ये सातत्यपूर्ण आणि दमदार कामगिरी केली आहे. राजस्थानविरुद्धच्या विजयामुळे गुजरात गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर पोहोचला असून, ११ सामन्यांत त्यांचे सात विजय झाले आहेत. उर्वरित सामन्यांपैकी एका सामन्यात विजय मिळाले तरी त्यांचे प्लेऑफमधील स्थान जवळपास निश्चित होऊ शकते.

दुसरीकडे, Rajasthan Royalsने हंगामात दणक्यात सुरूवात केली. संघाने मागील चारपैकी तीन सामने गमावले असून, प्लेऑफच्या आशा कायम ठेवण्यासाठी त्यांना आता विजयाची नितांत गरज आहे. राजस्थान सध्या सहा विजय आणि चार पराभवांसह चौथ्या स्थानावर आहे. प्लेऑफच्या चार जागांसाठी सहा संघांमध्ये चुरशीची लढत सुरू असल्याने प्रत्येक सामना अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

## सर्वात वेगवान अर्धशतक! उर्विल पटेलने घडवला इतिहास

**मुंबई)/वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६ स्पर्धेतील ५३ वा सामना लखनौ सुपर जायंट्स आणि चेन्नई सुपर किंग्स या दोन्ही संघांमध्ये सुरु आहे. चेपॉकच्या मैदानावर सुरु असलेल्या या सामन्यात उर्विल पटेलच्या फलंदाजीचा बोलबाला पाहायला मिळाला. धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या चेन्नई सुपर किंग्स संघाकडून युवा फलंदाज उर्विल पटेलने आयपीएल स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात वेगवान अर्धशतक झळकावलं आहे. त्याने अवघ्या १३ चेंडूंमध्ये आपलं अर्धशतक पूर्ण केलं. यासह त्याने सर्वात वेगवान अर्धशतक झळकावण्याच्या रेकॉर्डमध्ये यशस्वी जैस्वालची बरोबरी केली आहे.

या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जचा संघ २०४ धावांचा पाठलाग करण्यासाठी मैदानात आला होता. मोठ्या आव्हानाचा पाठलाग करताना चेन्नईला चांगल्या सुरुवातीची गरज होती. चेन्नईला ४५ धावांवर पहिला मोठा धक्का बसला. संजू सॅमसन २८ धावा करून माघारी परतला. त्यानंतर फलंदाजीला आलेल्या उर्विल पटेलने चेपॉकवर षटकारांचं वादळ आणलं. आधी आवेश खानच्या गोलंदाजीवर त्याने लागोपाठ ३ खणखणीत षटकार खेचले. त्यानंतर पुढच्याच षटकात दिग्वेश राठीच्या गोलंदाजीवर लागोपाठ २ षटकार, मग चौकार आणि मग पुन्हा एकदा षटकार खेचला. त्याच्याकडे युवराज सिंगचा रेकॉर्ड मोडून ११ चेंडूत अर्धशतक झळकावण्याची संधी होती. पण ही संधी थोडक्यात हुकली . त्याने १३ चेंडूंमध्ये आपलं अर्धशतक पूर्ण केलं. यासह त्याने यशस्वी जैस्वालच्या रेकॉर्डची बरोबरी केली आहे. तो या स्पर्धेत सर्वात वेगवान अर्धशतक झळकावणाऱ्या फलंदाजांच्या यादीत संयुक्तरित्या अव्वल स्थानी पोहोचला आहे.

उर्विल पटेलला पहिल्यांदाच आयपीएल खेळण्याची संधी मिळाली आहे. पहिल्याच हंगामात त्याने स्वतःला सिद्ध केलं आहे. चेन्नईसारख्या ५ वेळच्या चॅम्पियन संघात संधी मिळणं ही खूप मोठी गोष्ट आहे. संधी मिळाल्यानंतर संधीचं सोनं करणं महत्वाचं असतं, हे उर्विल पटेलने करुन दाखवलं आहे. उर्विल पटेल हा चेन्नई सुपर किंग्ज संघासाठी सर्वात वेगवान अर्धशतक झळकावणारा फलंदाज ठरला आहे. याआधी चेन्नईच्या कुठल्याही फलंदाजाला १३ चेंडूत अर्धशतक झळकावता आलेलं नाही. तसेच हे आयपीएल स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात वेगवान अर्धशतक देखील आहे. १२ चेंडूत अर्धशतक पूर्ण केलं असतं, तर त्याने युवराज सिंगच्या रेकॉर्डची बरोबरी केली असती. पण हा रेकॉर्ड थोडक्यात हुकला.



# अरमान कोहलीसोबतचं रिलेशन म्हणजे 'ट्रॉमा बाँड', तनीषा मुखर्जीकडून 'बिग बॉस'ची पोलखोल

स्टार किड असलेली बॉलिवूड अभिनेत्री तनीषा मुखर्जी हिला आपल्या आई, बहिणीसारखं यश मिळवता आलं. तिच्या वैयक्तिक आयुष्यातही अनेक चढउतार आले. आता तिनं तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल काही गोष्टी शेअर केल्या आहेत. अभिनेत्री आणि 'बिग बॉस ७' ची उपविजेती तनीषा मुखर्जी सध्या तिच्या एका धक्कादायक मुलाखतीमुळं चर्चेत आली आहे. तब्बल १०-१२ वर्षांनंतर तनीषानं 'बिग बॉस'मधील तिचा प्रवास आणि अभिनेता अरमान कोहलीसोबत असलेल्या तिच्या वादग्रस्त नात्यावर मौन सोडल्यानं चर्चा सुरू आहे.अरमानसोबतचं तिचं नातं हे प्रेम नसून केवळ एक 'ट्रॉमा बाँड' (Trauma Bond) होता, असं खळबळजनक वक्तव्य तिनं आता केलं आहे.एका नुकत्याच




दिलेल्या मुलाखतीत तनीषाने सांगितलं की, 'बिग बॉस'मध्ये जाण्याचा तिचा निर्णय हा विचारपूर्वक घेतलेला नव्हता. ती म्हणाली, "मी एका वेगळ्याच, काल्पनिक जगात वावरत होते. मला वाटलं होतं की तिथं ना सगळं छान छान असेल. माझ्या मॅनेजरनं मला सांगितलं होतं की, या शोमुळे तुझी एक नवीन प्रतिमा लोकांसमोर येईल, पण प्रत्यक्षात तिथं फक्त तेच दाखवलं जातं जे निर्मात्यांना दाखवायचं असतं."शो दरम्यान तनीषा आणि अरमान कोहली यांच्यातील जवळीक खूप चर्चेत होती. यावर भाष्य करताना तनीषा म्हणाली, हो, तो अनुभव खूप त्रासदायक होता. अशा रिॲलिटी शोमध्ये तुम्ही दबावाखाली असता आणि त्यातूनच 'ट्रॉमा बाँड' तयार होतात.

जेव्हा तुम्ही त्या परिस्थितीतून बाहेर पडता आणि स्वतःला सावरता, तेव्हा तुम्हाला जाणवतं की त्या व्यक्तीशी तुमचे विचार जुळत नाहीत. आज मला अशा लोकांशी बोलायचीही इच्छा नाही.तनीषानं इतर स्पर्धकांवरही गंभीर आरोप केले आहेत. तिच्या मते, शोमधील इतर स्पर्धक केवळ 'स्क्रीन टाइम' मिळवण्यासाठी तिच्या कुटुंबाच्या नावाचा वापर करत होते. मी माझ्या कुटुंबाची प्रतिष्ठा जपण्यासाठी अनेक गोष्टींवर गप्प राहिले. पण शोमधून बाहेर आल्यावर मला समजलं की लोक माझी बहीण काजोल आणि भावोजी अजय देवगण यांच्या नावाचा वापर करून स्वतःचा फायदा करून घेत होते. ते मोठे स्टार्स आहेत, ते फुकट कशाला येतील? त्यांना ३-४ कोटी रुपये दिले तरच ते येतील ना? प्रत्येकजण तिथं पैशांसाठी काम करत होता, असं म्हणत तनीषानं संताप व्यक्त केलाय.बिग बॉसनंतरही तनीषा आणि अरमान कोहली काही दिवस रिलेशनमध्ये होते. २०१४ मध्ये वेगळे झाले होते. आता इतक्या वर्षांनी तिनं या नात्यावर केलेल्या भाष्यमुळं सोशल मीडियावर पुन्हा एकदा चर्चेला उधाण आलं आहे.

# Celina Jaitly यांच्या पतीविरोधात मुंबईत FIR ; कौटुंबिक हिंसाचार प्रकरणाला कायदेशीर वळण

बॉलिवूड अभिनेत्री सेलिना जेटली गेल्या काही महिन्यापासून वैयक्तिक आयुष्यामुळं चर्चेत आहे. तिच्या वैवाहिक आयुष्यात आलेल्या वादळानंतर तिनं अनेकदा सोशल मीडियावर पोस्ट शेअर पतीवर गंभीर आरोप केलेत. सेलिना आणि तिचे पती पीटर हाग यांच्यातील वादानं आता कायदेशीर वळण घेतलं आहे.मुंबई पोलिसांनी पीटर हाग याच्याविरुद्ध कौटुंबिक हिंसाचार, शारीरिक छळ आणि धमकावल्याप्रकरणी FIR नोंदवला आहे. या प्रकरणाच्या गांभीर्यामुळं पोलिसांनी पीटर याच्याविरोधात 'लुक आऊट सर्कुलर' देखील जारी केलं असून, तपास यंत्रणांना सहकार्य न केल्यामुळं ही कारवाई करण्यात आली आहे. सेलिना जेटलीनं मुंबईच्या वर्सोवा पोलीस ठाण्यात आपल्या पतीविरुद्ध तक्रार दाखल केली होती. सेलिनानं दिलेल्या तक्रारीनुसार, ऑस्ट्रियाचा व्यावसायिक असलेला पीटर हाग तिला सातत्यानं मानसिक आणि शारीरिक त्रास देत होता. सेलिनानं आरोप केला आहे की, पीटरनं तिला तिच्या मुलांपासून दूर ठेवलं असून तिला आर्थिकदृष्ट्या कमकुवत करण्याचा



प्रयत्न केला.पीटर याच्यावर २०२३ च्या विविध कलमांखाली हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कलम ८५: क्रूरता , कलम ११५(२): दुखापत करणे , कलम ३५१(२) आणि ३५२: गुन्हेगारी धमकी आणि छळवणूक, याशिवाय, कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा, २००५ अंतर्गत देखील कारवाई सुरू आहे. सेलिनाने पीटरवर तिची मुंबईतील मालमत्ता बळकावण्याचा प्रयत्न केल्याचा आणि सुमारे ५० कोटी रुपयांच्या नुकसानीचा दावा ठोकला आहे.काही दिवसांपूर्वीच सेलिनाने सोशल मीडियावर एक अत्यंत भावूक व्हिडिओ शेअर केला होता. यामध्ये ती आपल्या मृत मुलाच्या थडग्यावर रडताना दिसत होती. "मला माझ्या जिवंत मुलांची भेट घेऊ दिली जात नाही आणि त्यांना अज्ञात ठिकाणी ठेवण्यात आलं आहे," असा आरोप तिनं केला. ऑस्ट्रियाच्या कोर्टानं मुलांचा ताबा दोघांनाही दिलेला असतानाही पीटर मुलांशी संवाद साधू देत नसल्याचं तिनं नमूद केलं आहे.

# मी एकटी पडले होते, दारुला जवळ केलं, रणबीर आणि रिद्धीमाने मला...'

बॉलिवूडमधील लोकप्रिय आणि एव्हरग्रीन अभिनेत्री नीतू सिंग कपूर सध्या त्यांच्या 'दादी की शादी' या चित्रपटामुळं चर्चेत आहेत. या चित्रपटाच्या प्रमोशन निमित्तानं दिलेल्या एका मुलाखतीत त्यांनी वैयक्तिक आयुष्याबद्दल मोठा खुलासा केला.नीतू यांचे पती आणि दिग्गज अभिनेते ऋषी कपूर यांच्या निधनानंतर कपूर कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला होता. मात्र, त्यांच्या निधनानंतर नीतू कपूर कशा प्रकारे या धक्क्यातून सावरल्या, याबद्दल त्यांनी नुकताच एक मोठा खुलासा केला आहे. ऋषी कपूर यांच्या निधनानंतर उद्भवलेल्या एकाकीपणाशी झुंज देण्यासाठी त्यांनी मद्यपानाला जवळ केलं होतं, अशी कबुली नीतू कपूर यांनी दिली आहे.एका नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत नीतू कपूर यांनी त्यांच्या आयुष्यातील त्या कठीण काळाबद्दल मोकळेपणानं भाष्य केलं. त्या म्हणाल्या, "ऋषीजींच्या जाण्यानंतर माझ्या आयुष्यात मोठी पोकळी निर्माण झाली होती. तो काळ माझ्यासाठी अत्यंत कठीण होता. स्वतःला सावरण्यासाठी आणि मनातील विचार शांत करण्यासाठी मी मद्यपान करायला सुरुवात केली होती. मला वाटलं होतं की यामुळं माझं दुःख थोडं कमी होईल."नीतू कपूर यांनी पुढं सांगितलं की, त्यांची मुले रणबीर कपूर आणि रिद्धीमा कपूर साहनी यांनी त्यांना या परिस्थितीतून बाहेर काढण्यासाठी मोलाची साथ दिली. "मला जाणीव झाली की मी जे करतेय ते चुकीचं आहे. माझ्या मुलांनी मला खूप आधार दिला आणि हळूहळू मी त्या सवयीतून स्वतःला बाहेर काढलं.

कामात स्वतःला गुंतवून घेणं हाच यावरचा उत्तम उपाय होता," असंही त्यांनी नमूद केलं. ऋषी कपूर यांच्या निधनानंतर नीतू कपूर यांनी 'जुग जुग जिओ' या चित्रपटाद्वारे मोठ्या पडद्यावर कमबॅक केलं. कामामुळं त्यांना मानसिक स्वास्थ्य लाभले आणि त्या पुन्हा एकदा आपल्या जुन्या आयुष्यात परतल्या. दुःख कुरवाळत बसण्यापेक्षा स्वतःला कामात झोकून देणं हाच आयुष्याचा खरा मार्ग आहे,असंही नीतू कपूर यांनी म्हटलं.तसंच कामाबद्दल बोलायचं झालं तर सध्या त्या विविध रिॲलिटी शो आणि प्रोजेक्ट्समध्ये व्यग्र आहेत.

# नऊवारी साडी, गळयात मंगळसूत्र... अखेर बोहल्यावर चढली लग्नानंतर होईलच प्रेम फेम ज्ञानदा रामतीर्थकर, लग्नातला फोटो समोर

गेल्या अनेक दिवसांपासून अभिनेत्री ज्ञानदा रामतीर्थकर हिच्या लग्नाची चर्चा सुरू होती. ते लग्न अखेर थाटामाटात पार पडलं आहे. अभिनेत्री ज्ञानदा रामतीर्थकरनं तिचा दीर्घकाळाचा मित्र आणि सिनेमॅटोग्राफर हर्षद याच्याशी लग्नगाठ बांधली आहे.८ मे २०२६ रोजी या जोडीनं आपल्या जवळच्या मित्र-मैत्रिणींच्या आणि नातेवाईकांच्या उपस्थितीत लग्नगाठ बांधली. लग्नाचे वेगवेगळे विधी आणि सोहळेही कुटुंबियांच्या उपस्थितीत पार पडले.ज्ञानदा आणि हर्षद यांच्या लग्नाचे सेलिब्रेशन गेल्या काही दिवसांपासून सुरू होते. ७ मे रोजी हर्षदच्या हळदीचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला होता, ज्यामध्ये तो आपल्या आईसोबत डान्स करताना दिसला होता.तर लग्नाआधी 'ठिपक्यांची रांगोळी' मालिकेतील कलाकारांनी ज्ञानदासाठी खास केळवण आयोजित केलं होतं. सुप्रिया पाठारे, नम्रता प्रधान यांसारख्या सहकलाकारांनी तिला या नव्या प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. लग्नासाठी ज्ञानदाने पारंपारिक मराठमोळा साज निवडला होता, तर हर्षदनेही त्याला साजेसा असा राजेशाही पोषाख परिधान केला होता.ज्ञानदा आणि हर्षद हे एकमेकांना गेल्या ७-८ वर्षांपासून ओळखतात. २०१५ मध्ये एका शॉर्ट फिल्मच्या शूटिंग दरम्यान त्यांची पहिली भेट झाली होती. मैत्रीचं रूपांतर हळूहळू प्रेमात



झालं आणि अखेर त्यांनी आयुष्यभर एकत्र राहण्याचा निर्णय घेतला. या वर्षी फेब्रुवारी महिन्यात त्यांचा साखरपुडा पार पडला होता. चाहत्यांकडून शुभेच्छांचा वर्षावज्ञानदाच्या लग्नाचे फोटो समोर येताच सोशल मीडियावर चाहत्यांनी आणि सेलिब्रिटींनी शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. 'लग्नानंतर होईलच प्रेम' या मालिकेत काव्याची भूमिका साकारणाऱ्या ज्ञानदाला खऱ्या आयुष्यातही सुखद वैवाहिक जीवन लाभो, अशी भावना तिचे चाहते व्यक्त करत आहेत.ज्ञानदा रामतीर्थकर हिनं ज्याच्याशी लग्नगाठ बांधली आहे, त्याचं नाव हर्षद आत्माराम (Harshad Atmaram) असं आहे. हर्षद हा सिनेसृष्टीतीलच एक कलाकार असून तो एक उत्तम सिनेमॅटोग्राफर (DOP) आहे. त्यानं अनेक शॉर्ट फिल्म्स, जाहिराती आणि 'बंधू' या मराठी चित्रपटासाठी सिनेमॅटोग्राफर म्हणून काम पाहिले आहे.

# मिशन लक्ष्यवेध अंतर्गत ॲथलेटिक्स निवडचाचणी १४ मे रोजी

जनसंचलन/बुलढाणा

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालयामार्फत राज्यातील क्रीडा विकासासाठी राबविण्यात येत असलेल्या महत्त्वाकांक्षी "मिशन लक्ष्यवेध" उपक्रमांतर्गत बुलढाणा जिल्ह्यात क्रीडा प्रतिभा विकास केंद्र कार्यान्वित करण्यात येत आहेत. या केंद्रांच्या माध्यमातून जिल्ह्यातील गुणवंत खेळूंना ऑलिम्पिक स्तरावरील कामगिरीसाठी तयार करण्यात येणार असून विविध खेळांच्या निवडचाचणी प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. या उपक्रमांतर्गत बुलढाणा जिल्ह्यात ॲथलेटिक्स, आर्चरी, बॅडमिंटन, बॉक्सिंग व वेटलिफ्टिंग या पाच खेळांसाठी प्रशिक्षण केंद्रे सुरू करण्यात येणार आहेत. प्रत्येक खेळ प्रकारासाठी २० खेळाडूंची निवड करण्यात येणार असून त्यांना जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. यामध्ये गुणवत्ताधारक प्रशिक्षक, फिजिओथेरपिस्ट, न्यूट्रिशनिस्ट, पूरक आहार, क्रीडा साहित्य, गणवेश, वैद्यकीय चाचण्या तसेच देश-विदेशातील प्रशिक्षणासाठी सहकार्याचा समावेश आहे. त्यानुसार ॲथलेटिक्स खेळाची निवडचाचणी दि. १४ मे २०२६ रोजी सकाळी ७ वाजता जिल्हा क्रीडा संकुल, बुलढाणा येथे आयोजित करण्यात आली आहे. अर्ज सादर केलेल्या तसेच निवडचाचणी देण्यास इच्छुक असलेल्या खेळाडूंनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीमती भक्ती आंग्रे यांनी केले आहे. यापूर्वी निवडचाचणी दिलेल्या खेळाडूंनाही पुन्हा चाचणी देण्याची संधी उपलब्ध राहणार आहे. खेळाडूंनी अर्जासोबत आवश्यक मूळ कागदपत्रे तसेच तीन पासपोर्ट आकाराचे फोटो जोडून कार्यालयात सादर करावेत, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# पाणी टंचाई निवारणार्थ बुलढाणा तालुक्यातील मढ गावासाठी टँकर मंजूर




जनसंचलन/बुलढाणा

पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता बुलढाणा तालुक्यातील मढ गावासाठी पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. आदेशात ठरवून दिल्याप्रमाणे नियमित टँकरव्दारे पाणी पुरवठा केल्या जाणार आहे, अशी माहिती बुलढाणा उपविभागीय अधिकारी यांनी दिली.मढ येथे ४४० पशुधन व २ हजार २५० लोकसंख्येसाठी एक टँकरद्वारे ७८ हजार ८०० लिटर्स पाणी पुरवठा दररोज करणार आहेत. पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. टँकरने केलेल्या खेपांची ग्रामपंचायतीला नोंद घेण्यात यावी. नोंदवहीची तपासणी नियमितपणे गटविकास अधिकारी यांनी करावी. निवीदाधारकाने टँकर नादुरूस्त झाल्यास त्वरित दुसरे टँकर उपलब्ध करून द्यावे, असे उपविभागीय अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविले आहे.

# महिला व बाल विकास विभागाच्या योजनांचा जिल्हास्तरीय आढावा

जनसंचलन/बुलढाणा

मा. निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयामार्फत जिल्हास्तरीय आढावा बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीत महिला व बाल विकास विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, बाल संरक्षण विषयक उपक्रम तसेच विभागीय समन्वयाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीस जिल्ह्यातील सर्व विभाग प्रमुख अधिकारी उपस्थित होते. महिला व बालकांच्या संरक्षण, पुनर्वसन, शिक्षण, आरोग्य व कल्याणासाठी विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा आढावा यावेळी घेण्यात आला. योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विभागांमध्ये अधिक समन्वय राखण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना करण्यात आल्या. बैठकीदरम्यान बाल संरक्षण, बालविवाह प्रतिबंध, महिला सक्षमीकरण तसेच शिक्षण व आरोग्यविषयक उपक्रम अधिक परिणामकारकपणे राबविण्यासाठी सर्व विभागांनी संयुक्तपणे कार्य करण्याचे आवाहन करण्यात आले. सदर बैठकीचे सचिव म्हणून जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी श्री. अमोल दिघोळे यांनी कामकाज पाहिले. बैठकीच्या शेवटी त्यांनी उपस्थित सर्व मान्यवर, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

पत्रकारीतेचा धर्म
आम्ही निभावणार


सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल
वेब साईड & पोर्टल चॅनल
वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर
कुठली ही बातमी निशुल्क
दैनिक निडर निर्भिड
जनसंचलन
काही तक्रार असल्यास संपर्क
शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलडाणा मो.9822720784,9373359040
पिन 443001

आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा
बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..


| गुंतवणुक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३११९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.
5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा...
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत
आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा
ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १०००० ३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली
मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४

# जिल्ह्यातील आंबा प्रेमींसाठी मेजवानी कृषी विज्ञान केंद्रात रंगणार भव्य आंबा महोत्सव २०२६!

**जनसंचलन बुलढाणा**

जिल्ह्यातील गावरान आणि सुधारित आंबा जातींचे जतन व्हावे आणि शेतकऱ्यांना हक्काची बाजारपेठ मिळावी, या उद्देशाने कृषी विज्ञान केंद्र बुलढाणा येथे गुरुवार, १४ मे २०२६ रोजी एका विशेष आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. केवळ प्रदर्शनच नाही, तर विक्री आणि तंत्रज्ञान मार्गदर्शनाचा त्रिवेणी संगम या महोत्सवात पाहायला मिळणार आहे.

**काय आहे खास?**

या महोत्सवात जिल्ह्यातील दुर्मिळ स्थानिक (गावरान) आंबा जातींची ओळख करून दिली जाणार आहे. तसेच, विविध सुधारित वाणांच्या फळांचे प्रदर्शन व थेट विक्रीसाठी स्टॉल्स उपलब्ध असणार आहेत. विशेष म्हणजे, ज्या शेतकऱ्यांकडे उत्कृष्ट गावरान आंबे आहेत, त्यांना आपली फळे प्रदर्शनात मांडण्याची आणि विकण्याची सुवर्णसंधी देण्यात आली आहे.

**महोत्सवाची ठळक वैशिष्ट्ये:**

विविध वाणांची प्रदर्शनी: हापूस, केशरपासून ते स्थानिक गावरान वाणांपर्यंतची विविधता. थेट विक्री: ग्राहकांना बागेतील ताजा आंबा



थेट शेतकऱ्यांकडून खरेदी करता येईल. कलम विक्री: बागेत लागवडीसाठी विविध जातींच्या आंब्याची कलमे उपलब्ध. तज्ज्ञांचे मार्गदर्शन: आंबा लागवड व आधुनिक व्यवस्थापन तंत्रज्ञानावर शास्त्रज्ञांचे विशेष सत्र. शेतकऱ्यांचा होणार सन्मान! आपल्या शेतातील गावरान आंबे प्रदर्शनात सहभागी करणाऱ्या आणि विक्रीसाठी आणणाऱ्या शेतकऱ्यांचासन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात येणार आहे. ही शेतकऱ्यांच्या कष्टाची आणि स्थानिक जैवविविधतेची दखल घेणारी एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी आणि आंबा प्रेमी नागरिकांनी या महोत्सवात सहभागी होऊन या उपक्रमाचा लाभ घ्यावा.दिनांक:गुरुवार, १४ मे २०२६ वेळ: सकाळी १०:०० ते सायंकाळी ४:०० वाजेपर्यंत शेतकरी नोंदणी: सकाळी ९:०० वाजल्यापासून सुरू. स्थळ: कृषी विज्ञान केंद्र, बुलढाणा. नोंदणी आणि स्टॉल बुकिंगसाठी संपर्क: प्रदर्शनात सहभागी होण्यासाठी किंवा स्टॉल आरक्षित करण्यासाठी तात्काळ ९९६०२३२४८० या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. बुलढाणावासियांनो, या गुरुवारी आंब्याचा गोडवा चाखायला आणि नवीन तंत्रज्ञान शिकायला विसरू नका!

## लोणार पोलिसांची धडाकेबाज कारवाई




**जनसंचलन/ लोणार**

महिलेचा चेहरा मॉर्फ करून अश्लील फोटो आणि व्हिडिओ तयार करून ते व्हॉट्सअॅपवर प्रसारित करणाऱ्या एका २१ वर्षीय तरुणाला लोणार पोलिसांनी शिताफीने अटक केली आहे. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली असून सायबर गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, बीबी (जि. बुलढाणा) येथील एका महिलेने तक्रार दिली होती की, तिच्या चेहऱ्याचा वापर करून अश्लील व्हिडिओ तयार करण्यात आले. आरोपीने हे व्हिडिओ पीडित महिलेसह गावातील इतर महिलांना व्हॉट्सअॅपवर पाठवले होते. इतकेच नाही तर, आपली ओळख लपवून आरोपीने महिलांना नग्न व्हिडिओ कॉल देखील केले होते. या गंभीर प्रकारामुळे परिसरात दहशतीचे आणि संतापाचे वातावरण होते. महिलेच्या तक्रारीवरून लोणार पोलिसांनी तांत्रिक तपास चक्रे फिरवली. तपासाअंती रवि गजानन वायाळ (वय २१, रा. खळेगाव, ता. लोणार) याला निष्पन्न करून दि. ०८ मे २०२६ रोजी अटक करण्यात आली. आरोपीकडून गुन्ह्यात वापरलेला २०,५०० रुपये किमतीचा कंपनीचा मोबाईल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई बुलढाण्याचे पोलीस अधीक्षक निलेश तांबे अपर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.तपासात पो.नि. प्रकाश सदगीर, पोकाँ गणेश लोढे, अनिल शिंदे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली, तर सायबर सेलचे राजू आडवे आणि पवन मखमले यांचे तांत्रिक सहकार्य लाभले.




दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८